तरुण भारत बुधवार, २९ डिसेंबर २०२१

# सभासद, संचालक जागरुक असतील तरच संस्थेचा विकास

## डॉ. जे. एफ. पाटील यांचे मत : गडहिंग्लजला रवळनाथ संस्थेत सभासदांना प्रशिक्षण

प्रतिनिधी
गडहिंग्लज

समाजातील सर्व सामान्य माणसाची आर्थिक पत उंचावण्यासाठी कल्याणकारी उपक्रम राबवण्याबरोबरच आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक गरजा भागवून संतुलित विकास व निरोगी समाजाची निर्मीती करणे हेच सहकारी संस्थेचे उत्तरदायित्व असते. सभासद, संचालक व कर्मचारी जागरुक असतील तरच संस्थेचा संतुलित आणि सर्वांगीण विकास होऊ शकतो असे मत अर्थतज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांनी येथे व्यक्त केले.

दिल्ली येथील राष्ट्रीय सहकारी संघ आणि रवळनाथ को. ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित



गडहिंग्लज : कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. जे. एफ. पाटील, व्यासपीठावर संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले, डॉ. दत्ता पाटील, ॲड. स्वरुप कराडे, डी. के. मायदेव आदी.

सभासद प्रशिक्षण कार्यशाळा नुकतीच पार पडली. संचालिका मिना रिंगणे यांनी स्वागत केले. संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक करुन कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला. प्रा. दत्ता म्हणाले, सभासद हेच संस्थेचे खरे मालक आहेत. संस्थेचा ताळेबंद व हिशोब पत्रकाबाबत सभासद जागरुक असतील तरच संस्था चांगल्या प्रकारे चालतात. त्यांची सर्वांगीण प्रगती होते. त्यामुळे सभासदांना वेळोवेळी प्रशिक्षणाची गरज आहे. संस्थेत चुकीचे घडत असल्यास संचालकांना जाब विचारण्याचा अधिकार आणि हक्क देखील सभासदांना आहे.

ॲड. स्वरुप कराडे म्हणाले, बँकिंग व्यवसाय कर्ज वितरण आणि कर्ज वसुलीमध्ये नियम व कायद्याचे पालन आवश्यक आहे. कर्ज वसुलीमध्ये कायद्याचे काटेकोरपणे पालन अनिवार्य असल्याचे सांगितले. यावेळी गीता चिंचणीकर, प्रा. वाय. पी. कोले, प्रा. मनोहर गुरबे, जयश्री डंगी यांनी प्रश्न विचारुन चर्चा घडवली. गौरी बेळगुद्री यांनी सुत्रसंचालन तर संचालक प्रा. विजयकुमार घुगरे यांनी आभार मानले. यावेळी संचालक डॉ. आर. एस. निळपणकर, डॉ. किरण पोतदार, प्रा. विजय आरबोळे, जोतीराम रावण, प्रा. अनिल उंदरे, डॉ. संजय चौगुले, रेखा पोतदार, सीईओ दत्तात्रय मायदेव, बाबासो मार्तंड, विजय बुगडे, सुनिलदत्त जाधव, अशोक सुळकुडे यांच्यासह अन्य उपस्थित होते.

पुण्य नगरी

# कर्ज वसुलीमध्ये कायद्याचे काटेकोर पालन आवश्यक

## ॲड. स्वरूप कराडे : गडहिंग्लजमध्ये रवळनाथच्या सभासदांना प्रशिक्षण

गडहिंग्लज : प्रतिनिधी

कर्ज वसुलीमध्ये कायद्याचे काटेकोर पालन अनिवार्य आहे. कर्ज वितरणासाठी चांगल्या व्यक्ती व संस्थांची निवड करणे आणि त्यांच्याकडून वेळेवर कर्ज वसुली होईल याकडे लक्ष देणे यावरच संस्थेची प्रगती अवलंबून आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे कायदेतज्ज्ञ ॲड. स्वरूप कराडे यांनी केले.

नवी दिल्ली येथील राष्ट्रीय सहकारी संघ आणि रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स




गडहिंग्लज : प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ॲड. स्वरूप कराडे. सोबत एम. एल. चौगुले, जे. एफ. पाटील यांच्यासह अन्य.

सोसायटीच्या वतीने आयोजित सभासद प्रशिक्षण कार्यशाळेत ते बोलत होते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. जे. एफ. पाटील, दत्ता पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

मीना रिंगणे यांनी स्वागत केले. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविक केले. जे. एफ. पाटील, दत्ता पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी गीता चिंचणीकर, वाय. पी. कोले, मनोहर गुरवे, जयश्री डंगी यांनी चर्चासत्रात सहभाग घेतला. जोतिराम रावण, अनिल उंदरे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आर. एस. निळपणकर, किरण पोतदार, विजय आरबोळे, संजय चौगुले, रेखा पोतदार, दत्तात्रय मायदेव, बाबासाहेब मार्तंड, विजय बुगडे, सुनीलदत्त जाधव, अशोक सुळकुडे उपस्थित होते.